महाराष्ट्र शासन
# विभागीय शिक्षण उपसंचालक कार्यालय,पुणे
१७, डॉ.आंबेडकर मार्ग, पुणे-४११००१
.ई-मेल-dydpune@gmail.com वेबसाईट-www.dydepune.com फोन.२०-२६१२५६९६/२६१२२२१७.

जाक्र.शिउसं/पुवि/वै.मा/उमा-४०३/२०२२/ ७५४८ दिनांक- 14 JUL 2022

प्रति,

१. अध्यक्ष/ सचिव, सर्व संबंधित संस्था - अनुदानित कनिष्ठ महाविदयालये, पुणे विभाग, पुणे.

२. प्राचार्य/मुख्याध्यापक, सर्व अनुदानित कनिष्ठ महाविदयालये/ उच्च माध्यमिक शाळा, पुणे विभाग, पुणे

**विषय :- शासन निर्णय दि. १० जून २०२२ च्या अनुषंगाने वैयक्तिक मान्यता प्रस्ताव सादर करणेबाबत.**

१) दिनांक २३.०६.२०१७ पूर्वी नियुक्त पूर्णवेळ शिक्षण सेवक. (पवित्र प्रणाली लागू होण्यापूर्वीच्या नियुक्त्या)

२) मा. न्यायालयाच्या निर्णयानुसार पूर्णवेळ शिक्षक/शिक्षण सेवक नियुक्ती प्रस्ताव.

३) अल्पसंख्याक अनुदानित उच्च माध्यमिक कडील पूर्णवेळ शिक्षण सेवक नियुक्त्यांचे प्रस्ताव.

**संदर्भ-** १. शालेय शिक्षण विभाग शासन निर्णय क्र. एसएसएन-१००७/(३६/०७)/माशि-२, दि. ०६.०२.२०१२

२. शासन निर्णय क्र. शालार्थ -१११८/प्र.क्र.३०/टीएनटी-३, दि. १०.०६.२०२२

उपरोक्त विषयास अनुसरुन कळविण्यात येते की, वरील विषयामध्ये नमूद करणेत आलेप्रमाणे शासन निर्णय दि. २३.०६.२०१७ पुर्वी नियमाप्रमाणे सर्व प्रक्रिया राबवुन नियुक्ती केलेले पुर्णवेळ शिक्षक/ शिक्षण सेवक नियुक्तीचे प्रस्ताव सोबत जोडलेल्या चेकलिस्टनुसार सादर करावेत.

१) वरील विषयातील अनुदानितकडील प्रस्ताव हे पायाभूत मंजूर पदावर नियुक्त दि. २३/०६/२०१७ पूर्वी करणेत आलेल्या नियुक्त्या यासाठीच आहेत. या व्यतिरिक्त करणेत आलेल्या नियुक्त्यांचे प्रस्ताव सादर करणेत येवू नयेत.

२) आपल्या कनिष्ठ महाविद्यालयाकडे नियुक्त केलेल्या शिक्षण सेवकांचे परिपूर्ण प्रस्ताव सोबतच्या चेकलिस्ट प्रमाणे तसेच शासन निर्णय दि. ०६.०२.२०१२ व दि. १०.०६.२०२२ मध्ये नमूद केल्यानुसार कागदपत्रांची पूर्तता, शासन निर्णय दि. १०.०६.२०२२ नुसार **विवरणपत्र 'अ'** मधील माहिती यासह **दिनांक. १५.०८.२०२२ पुर्वी** सादर करण्यात यावे. दि. १५.०८.२०२२ नंतर आलेल्या प्रस्तावाबाबत विचार केला जाणार नाही. तसेच दिनांक. १५.०८.२०२२ नंतर प्रस्ताव कार्यालयामध्ये स्वीकारले जाणार नाहीत याची नोंद घ्यावी.

३) ज्या कर्मचा-यांचे प्रस्ताव आहेत त्यांनी अथवा कोणीही याबाबत कार्यालयात भेटू नये.

४) शासन निर्णय दिनांक १०.०६.२०२२ नुसार विहित कालमर्यादेमध्ये पूर्णवेळ नियुक्त कर्मचा-यांचे प्रस्तावावर निर्णय घ्यावयाचे असल्याने व पुन्हा वैयक्तिक मान्यता प्रस्ताव स्विकारण्यात येणार नसलेने सोबतच्या चेकलिस्ट नुसार परिपूर्ण प्रस्ताव सादर केले जातील याची खबरदारी घेण्यात यावी.

५) सदर नियुक्त्यांचे प्रस्ताव यापूर्वी सादर केले असले तरी दिलेल्या मुदतीत स्वतंत्र व परिपूर्ण प्रस्ताव सादर करणे आवश्यक राहील. तसेच सदर नियुक्तीबाबत या कार्यालयाकडून पूर्वी देणेत आलेल्या त्रुटींचे पत्र प्रस्तावासोबत जोडणेत यावे.

**२/-** उपरोक्त प्रमाणे वैयक्तिक मान्यतेचे प्रस्ताव सादर करताना शासन निर्णय दि. ०६.०२.२०१२ मधील तरतूदी/अटी यांचे अवलोकन करुन व निकषानुसार योग्य असणारे तसेच मागासवर्ग आरक्षण कायदयानुसार असलेले प्रस्तावच सादर करावेत. आरक्षण डावलून केलेल्या नियुक्तींच्या मान्यतेचे प्रस्ताव सादर करु नयेत. अन्यथा मागासवर्ग आरक्षण कायदयाचा भंग केल्याबाबत नियुक्ती प्राधिकारी म्हणून आपणावर कारवाई प्रस्तावित केली जाईल याची नोंद घ्यावी.

**महत्वाच्या सूचना :-**

१) प्रस्तावाचे प्रत्येक पान पृष्ठांकित व साक्षांकीत करावे.

२) संस्थेचा नियुक्तीवेळचा व अदयायावत सदयस्थितीचा मागासवर्ग कक्षाने तपासलेला रोस्टर गोषवारा सादर करावा.

**सोबत- १.** मान्यता प्रस्ताव चेकलिस्ट

**२. शा.नि. दि. १०.०६.२०२२ मधील विवरणपत्र 'अ'**

(औंदुबर उकिरडे)
शिक्षण उपसंचालक
पुणे विभाग, पुणे-१

**प्रत- माहितीस्तव सविनय सादरः- १. मा. आयुक्त,** शिक्षण आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, मध्यवर्ती शासकीय इमारत, पुणे

२. मा. शिक्षण संचालक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण संचालनालय, म.रा. पुणे